जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2019
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात आजपासून भौतिकशास्त्रची आंतरराष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागामार्फत १० व ११ जानेवारी दरम्यान मटेरियल्स अँड मटेरियल्स बेसड डिव्हाईस फॅब्रिकेशन या विषयावरील चौथ्या आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्घाटन आज सकाळी साडेदहा वाजता आयआयटी वाराणसीतील प्रा.जितेन्द्र कुमार आणि प्रा.पी.चक्रवर्ती यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. कुलगुरू डॉ देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षस्थानी आहेत, अशी माहिती प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागामार्फत या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील पदार्थविज्ञान विषयाशी संबधित व्यावसायिक,उद्योजकांशी विचारांची आदानप्रदान करण्याची संधी संशोधकांना मिळणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2019
पुण्यनगरी



# विद्यापीठात किचन गार्डनचे प्रशिक्षण

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या लोकविकास केंद्रामार्फत किचन गार्डन प्रशिक्षण वर्ग दि. ११ जानेवारी ते दि. २६ एप्रिल या कालावधीत प्रत्येक शुक्रवारी, दुपारी १ ते ३ यावेळेत लोकविकास केंद्रामध्ये घेण्यात येणार आहे. या प्रशिक्षण वर्गामध्ये घरगुती कचऱ्याचे व्यवस्थापन, भाजीपाला व फळे यांची लागवड, टेरेस व बाल्कनी गार्डन, होम गार्डन, ग्राफ्टिंग तसेच जैविक खते व जंतूनाशके, किचन गार्डनिंगचे विविध प्रकार शिकवले जाणार आहेत. हा कार्यक्रम पूर्णपणे मोफत असून त्यासाठी वयाची व शिक्षणाची कोणतीही अट नाही. इच्छुकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन लोकविकास केंद्रातर्फे करण्यात आले आहे.